वर्ष-०८ | अंक-०६ | मुंबई, मंगळवार २८ डिसेंबर २०२१ ते ०३ जानेवारी २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
शासनाच्या नावाने जोगवा मागितला मात्र सरकारकडे जमा केलाच नाही; काय आहे हा प्रकार?

3 → कल्याणमध्ये दुचाकी उभी करण्यावरून वाद, पोलिसाला चौघांची बेदम मारहाण

मूल होत नसल्याने भाचीला पळवलं, मावशीसह नवऱ्यालाही अटक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## एनसीबी अधिकारी असल्याचे सांगत मागितली खंडणी; कारवाईच्या भीतीने अभिनेत्रीची आत्महत्या




अंबोली पोलिसांनी नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे (एनसीबी) अधिकारी असल्याच्या आरोपावरून शनिवारी दोघांना अटक केली. सांताक्रूझ (पश्चिम) येथील हॉटेलमध्ये एका रेव्ह पार्टीत छापा घालताना एका अभिनेत्रीला आणि तिच्या मित्रांना या दोघांनी एनसीबी अधिकारी असल्याचे सांगून पकडले होते. तसेच त्यांनी अभिनेत्रीकडून २० लाख रुपयांची मागणी केली होती. त्यानंतर या दोघांच्या त्रासाला कंटाळून जोगेश्वरीत राहणाऱ्या एका २८ वर्षीय भोजपुरी अभिनेत्रीने आत्महत्या केली आहे. पोलिसांनी सांगितले की, भोजपुरी चित्रपटांमध्ये काम करणारी आणि जोगेश्वरी (पश्चिम) येथे भाड्याने ...पान २ वर...

## राज्यात निर्बंध लावल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा महत्वाचा आदेश; म्हणाले...




कोविडचा संसर्ग वाढत असून तो रोखण्यासाठी लसीकरणाचा वेग अधिक वाढविण्याची गरज आहे. आपल्याला अधिक दक्षता बाळगून काटेकोर पाऊले उचलावी लागणार आहेत असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज सांगितले. टास्क फोर्सची बैठकही येत्या एक दोन दिवसांत आयोजित करावी असेही त्यांनी निर्देश त्यांनी दिले आहेत. सोमवारी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत वाढत्या संसर्गावर चिंता व्यक्त करण्यात आली. यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास यांनी सादरीकरणात जानेवारीच्या मध्याला कोविडच्या सक्रिय रुग्णात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली असून लसीकरणाचा वेग वाढविण्याची गरज आहे असे सांगितले. काही ...पान २ वर...

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीला मुदतवाढ ही रीतसरच – अशोक चव्हाण



अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे बांधकाम करणाऱ्या एल ॲण्ड टी कंपनीला मिळालेल्या मुदतवाढीबाबत विनायक मेटे यांनी विधान परिषदेत लक्ष्यवेधी सूचना मांडली. मुदतवाढीचा निर्णय हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने परस्पर घेण्यात आला असल्याचा आरोप मोठे यांनी केला. हा निर्णय बेकायदेशीर असल्याचेही मेटे यावेळी म्हणाले. या लक्ष्यवेधीला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री अशोक चव्हाण यांनी ही मुदतवाढ रीतसर असल्याचे सांगितले. ...पान २ वर...

## विधानसभाध्यक्ष निवडणूक अधांतरी ; नियमात बदल केल्याने कायदेशीर सल्ला घेण्याची राज्यपालांची भूमिका

मुंबई : विधानसभा अध्यक्ष निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेण्याऐवजी खुल्या किंवा आवाजी मतदानाने घेण्याच्या नियमबदलाबाबत कायदेशीर अभिप्राय घेण्याचा निर्णय राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेतला आहे. राज्यपालांच्या या पवित्र्यामुळे विधानसभा अध्यक्ष निवडणूक संकटात सापडली आहे. विधानसभा अध्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याची शिफारस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपाल कोश्यारी यांच्याकडे केली आहे. त्यास राज्यपालांची मान्यता न मिळाल्याने महाविकास आघाडी सरकारमधील ज्येष्ठ मंत्री



बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ आणि एकनाथ शिंदे यांनी रविवारी सायंकाळी राजभवनावर जाऊन राज्यपाल कोश्यारी यांची भेट घेतली. मुख्यमंत्री ठाकरे यांच्या शिफारशीनुसार विधानसभा अध्यक्ष निवडणूक घोषित करण्याची विनंती या नेत्यांनी राज्यपालांना केली. निवडणूक नियमात बदल केल्यासंदर्भात राज्यपालांनी या नेत्यांकडे विचारणा केल्याचे शिंदे यांनी सांगितले. याबाबत कायदेशीर बाबी तपासण्याचा निर्णय राज्यपालांनी घेतला आहे.राज्यपाल तातडीने कायदेशीर मत घेऊन सोमवारी सकाळपर्यंत निवडणुकीस ...पान २ वर...

## उमरगा पोलिसांनी सापळा रचून 22 लाखांचा गुटखा पकडला!



रहिम शेख, उस्मानाबाद : जिल्ह्यातील उमरगा शहर हे आंध्रा प्रदेश- महाराष्ट्र सीमेवरील गाव हैदराबादहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या एका संशयित आयशर टेंपोला पकडून २२ लाख १६ हजार रुपये किमतीचा तंबाखू मिश्रित सुगंधी सुपारी, गुटखा पकडण्यात उमरगा पोलिसांना यश आलं आहे. या कारवाईत टेम्पोसह एकूण २७ लाख १६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल उमरगा पोलिसांनी सापळा रचून जप्त केलाय.

उमरगा तालुक्यातील तलमोड शिवारात 4-5 च्या दरम्यान उमरगा पोलिसांनी ही कारवाई केली. उमरगा पोलिस निरीक्षक इकबाल सय्यद यांना गुटख्याची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस अधीक्षक नीवा जैन, उपविभागीय अधिकारी रमेश बरकते आणि पोलिस निरीक्षक इक्बाल सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक महेश क्षीरसागर यांच्या पथकाने राष्ट्रीय महामार्गावरील तलमोड शिवारात येणाऱ्या जाणाऱ्या वाहनावर नजर ठेवली.

दरम्यान, ...पान २ वर...

## कणकवली पोलिसांकडून शोध सुरु; गृहखात्याकडून कठोर निर्देश

मुंबई: सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे विद्यमान अध्यक्ष सतीश सावंत यांचे निकटवर्तीय असलेल्या संतोष परब यांच्यावर झालेल्या हल्लाप्रकरणात भाजप आमदार नितेश राणे यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. नितेश राणे (Nitesh Rane) यांच्या अटकेसाठी शिवसेना प्रचंड आक्रमक झाली आहे. शिवसेनेचे आमदार वैभव नाईक यांनी सोमवारी सकाळी कणकवली पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला होता. तर दुसऱ्या बाजूला सभागृहात शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांनी नितेश राणे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. यानंतर कणकवली पोलिसांकडून नितेश राणे यांचा शोध सुरु आहे.

प्राथमिक माहितीनुसार, नितेश राणे सध्या अज्ञातवासात गेले आहेत. काल रात्रीपासून त्यांचा फोन नॉट रिचेबल आहे. याप्रकरणात अटक होण्याची शक्यता असल्याने नितेश राणे गायब झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे सध्या सिंधुदुर्गात प्रचंड तणावाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची चर्चा झाली असून त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

आमदार सुनील प्रभू यांच्या मागणीनंतर गृहराज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी त्यांना कारवाईविषयी आश्वस्त केले. कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. पोलीस अधीक्षक स्वत: याप्रकरणाचा तपास करत आहेत. या हल्ल्यातील एका आरोपीला दिल्लीतून अटक करण्यात आली. कोणत्याही आरोपीला पोलिसांकडून सोडले जाणार नाही, असे शंभुराज देसाई यांनी सांगितले. त्यामुळे आता राणे कुटुंबीय काय पाऊल उचलणार, हे पाहावे लागेल.



१८ डिसेंबर रोजी संतोष परब यांच्यावर कणकवलीत हल्ला झाला होता. जिल्हा बँक अध्यक्ष सतीश सावंत यांचे समर्थक करंजे गावचे माजी सरपंच संतोष परब यांच्यावर अज्ञात इनोव्हा कारमधून ...पान २ वर...

## चालकाचं नियंत्रण सुटलं, जीप-कारची समोरासमोर धडक, ३ जण जागीच ठार



परभणी : जीप-कारची समोरासमोर जोरदार धडकेत तीन जण जागीच ठार झालेत तर चारजण गंभीर जखमी झालेत. परभणीच्या पालम-लोहा या राष्ट्रीय मार्गावर पेठशिवणी गावानजीक डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी सुतगिरणीच्या दुपारी चारच्या सुमारास ही घटना घडली आहे.

अपघातानंतर पेठशिवणी येथील नागरिक तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना उपचारासाठी मदत केली. जीप क्रमांक एम एच २२ एएम ७३३३ व कार क्रमांक एमएच ०४ ई टी २७३४ ही दोन्ही वाहने रस्ता ने जात असताना वाहन चालकाचा ताबा सुटून एकमेकांना समोरा समोर धडक दिली आहे.

या अपघातात दोन्ही वाहनाचे समोरील बाजू चक्काचूर झाल्या आहेत. आतील तीन प्रवाशी जागेवरच ठार झाले ,असून ४ ते ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पालम ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठवण्यात आले आहे. मयत झालेल्या प्रवाशाची नावे मात्र अद्याप समजू शकली नाहीत.

## पुण्यात बंटर शाळेच्या समोर मोठा अपघात

### डंपरने पादचा्याला उडवले, पायाचा चेंदामेंदा



हडपसर येथील बंटर शाळेच्या समोरील रस्त्यावर एका डंपरने पादचाऱ्याला उडवले आहे. डंपरचे चाक पादचाऱ्याच्या पायावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. जवळच असलेल्या एका नागरिकाने धाव घेऊन जखमीला तात्काळ ससून रुग्णालयात हलवले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

आज सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या अपघातानंतर सासवड रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व पळून जाण्याचा प्रयत्न...पान २ वर...

## मुलीला सोडून पळालेल्या वडिलांना अटक

बाळाचा जन्म झाल्यानंतर रुग्णालयातून पलायन करणाऱ्या वडिलांना कळवा पोलिसांनी तब्बल २३ महिन्यांनंतर मुंबईतील मुलुंड परिसरातून अटक केली आहे. कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात मुलीचा जन्म झाल्यांनतर तिच्या पालनपोषणाची जबाबदारी न स्वीकारता आई, वडील पळून गेले. शिवाय त्यांनी रुग्णालयात स्वतःचे नाव आणि पत्ताही खोटा सांगितला होता. त्यामुळे मुलीच्या पालकांचा शोध घेणे अवघड अवघड झाले होते. या प्रकरणी मागील वर्षी ७ जानेवारी रोजी कळवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कळवा पोलिसांनी मुलीच्या आई-वडिलांचा शोध घेतला. मात्र, त्यांचा काही शोध लागला नाही. परिणामी या गुन्ह्याचा तपास पोलिसांनी बंद केला. परंतु, पुन्हा



या गुन्ह्याचा कळवा पोलिसांनी तपास करत आरोपींचा शोध सुरू केला. अखेर २३ महिन्यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश दिनकर, पोलिस उपनिरीक्षक घागरे आणि इतर पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने बाळाच्या वडिलास मुलुंड कॉलनी परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली. ही मुलगी आता २३ महिन्यांची झाली असून सध्या हे बाळ नवी मुंबईतील विश्व बालक केंद्रात आहे. आरोपीने हा गुन्हा पत्नीच्या मदतीने केला असून हे दाम्पत्य मूळचे उत्तर प्रदेशचे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुलगी झाल्यामुळे आरोपींनी रुग्णालयातून पळ काढला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पालक सोडून गेले त्यावेळी हे बाळ केवळ आठ दिवसांचे होते.

# शासनाच्या नावाने जोगवा मागितला मात्र सरकारकडे जमा केलाच नाही; काय आहे हा प्रकार?

तुळजापूरः तुळजापूर येथील एसटी कर्मचारी ४ नोव्हेंबर पासुन विविध मागण्यांसाठी एस टी डेपोच्या प्रवेशद्वार समोर संपावर होते त्यातील काही प्रमुख मागण्या शासनाने मान्य केल्या ४१% पगार वाढीसह घरभाडे महागाई भत्त्यात वाढ सुध्दा केली होती. परंतु एसटी महामंडळाचे राज्य सरकार मध्ये विलिनीकरणाच्या मागणीसाठी संपकरी अजूनही आग्रही आहेत. राज्यातील अनेक आगारातील कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला आहे. त्यामुळं बहुतांश आगारातील बससेवा पुन्हा सुरू झाल्या आहेत. मात्र, काही आगारात अजूनही कर्मचारी आपल्या मागणीवर ठाम आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर जिल्ह्यात मात्र एक वेगळाच प्रकार घडला आहे. तुळजापूर मधील कर्मचारी शासनाविरोधात रोज वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलन करत होते. २७ नोव्हेंबर रोजी एसटी कर्मचाऱ्यांनी तुळजापुर शहरातील मुख्य रस्त्यावर मंदिर परिसरात शासनाच्या नावाने जोगवा मागितला होता.

शासनाकडे कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पैसे नसल्यामुळे जमा होणारा जोगवा मुख्यमंत्री सहायत्ता निधीला किंवा परिवहन मंत्री अनिल परब यांच्याकडे जमा करणार, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले होते परंतु प्रत्यक्षात मात्र भलतंच घडलं आहे.

शहरात फिरुन मागितलेल्या जोगव्यातील हजारो रुपये शासनाकडे जमा न करता कर्मचाऱ्यांनी स्वतःकडे ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत चौकशी केली असता समोर यायला कोणी तयार नाही. काही कर्मचाऱ्यांनी संपातुन माघार घेतली आहे, असं सांगत आम्हाला त्या पैशाचा का झाले हे माहित नाही, असं सांगत आहेत.

तर दुसरे म्हणतात मी स्वतःचे पैसे जमा करतो, असं म्हटलं आहे. शासनाच्या नावाने मागितलेला निधी शासनाकडे जमा करायला पाहिजे होता. तसे केलेच नाही उलट स्वःताकडे ठेवुन शासनाची व जनतेची शुध्द फसवणुक झाली असल्याचं मत व्यक्त करण्यात येत आहे.



## हॉटेलमध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या खड्ड्यात पडून तरुणाचा मृत्यू



सिडकोतील हॉटेल एक्सलन्स इन येथे शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास २८ वर्षीय तरुणाचा हॉटेलमध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या खड्ड्यात पडून जागीच मृत्यू झाला. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद सुखदेव गिते (२९, रा. मोतीचौक, सावतानगर) हा सिडकोतील सिम्बॉयसिस महाविद्यालयाशेजारील हॉटेल एक्स्लन्स इनमध्ये पाहुण्यांसाठी रूम पाहायला जात होता. हॉटेलात नूतनीकरणाचे काम सुरू असल्याने तेथील कठडे तोडलेले होते. शनिवारी रात्री हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर गिते जात असताना या तुटलेल्या भागाचा अंदाज न आल्याने तोल जाऊन तो थेट ३५ फूट खोल खड्ड्यात पडला. खड्ड्यातील दगडांवर आपटल्याने गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या हॉटेलच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी मागील भागात जेसीबीच्या सहाय्याने २० फूट खोल खड्डा खोदण्यात आला आहे. त्यालगतच्या वरच्या मजल्यावरील कठडे तसेच संरक्षक भिंतीचा काही भागही तोडण्यात आलेला आहे. हॉटेल व्यवस्थापनाने या ठिकाणी सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजना करणे आवश्यक होते. मात्र, याबाबत व्यवस्थापनाने निष्काळजीपणा केल्याने विनोदचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांकडून करण्यात आला असून, या घटनेला हॉटेल व्यवस्थापनच जबाबदार असल्याने त्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. याप्रकरणी अंबड पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलिस उपनिरीक्षक शेवाळे पुढील तपास करीत आहेत.

## आईची सतत आठवण यायची म्हणून गर्भवती लेकीने उचलले धक्कादायक पाऊल



हिंगोलीः आईच्या निधनामुळे हताश झालेल्या मुलीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील बासंबा येथे मागील काही दिवसांपूर्वी आईचे निधन झाले होते. आईच्या निधनामुळं दुःखी झालेल्या मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. बासंबा येथील बजरंग कुरवाडे यांचा विवाह अंतकला हिच्यासोबत झाला होता. त्यांना चार मुली व एक मुलगा असं कुटुंब होते.

काही वर्षानंतर त्यांची पत्नी अंतकला हिचे निधन झाल्याने त्यांनी दुसरा विवाह केला होता. मागील वर्षी पहिल्या पत्नीची मुलगी शीतल हिचा विवाह बोरी शिकारी येथील विठ्ठल होळकर यांच्यासोबत झाला होता.

विवाहानंतर ती सासरी नांदायला देखील गेली होती. काही दिवस सगळं सुरळीत चालू असताना शीतलला तिच्या आईची नेहमी आठवण येत असल्याने ती त्याच दुःखात राहत होती. माझी आई नसल्याने माझं कसं होईल असे ते नेहमी म्हणत होती. परंतु सासरचे अनेक जण तिला समजवण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच दरम्यान तिने काल गोठ्यातील लाकडी दांड्याला गळफास घेत आपले जीवन संपवले. या घटनेची माहिती गावातील नागरिकांना मिळताच शितलाला उचलून शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

शीतलला तपासून डॉक्टरांनी मयत घोषित केले. याप्रकरणी मयत शितलचे वडील बजरंग कुर्डूवाडी यांनी बासंबा पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेचा तपास पोलिस अधिक करीत आहेत. दरम्यान या प्रकरणातील शितल होळकर ही गर्भवती आल्याची महिती पोलीसांनी दिलीय. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जालना हादरले; तरुणाची निर्घृण हत्या करून रचला आत्महत्येचा बनाव



जालनाः आत्महत्या भासविण्यासाठी तरुणाचे शव झाडाला लटकवल्याची संतापजनक घटना जालना जिल्ह्यात घडली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत गुन्हा दाखल केला आहे.

जालना जिल्ह्यातील खंडेवाडी तांडा येथील अनिल रघुनाथ थोरात हा २९ वर्षाचा युवक काल रात्री ८. ३०च्या दरम्यान आपल्या दुचाकीवरून घराकडे जात होता. त्यावेळी गावातीलच संशयित आरोपी प्रभाकर पवार, संदीप राठोड, अंजू राठोड, दिलीप राठोड, रवि राठोड या पाच जणांनी संगनमत करून अनिल थोरात याला जबर मारहाण केली. थोरात याला मारहाण केल्यानंतर या पाच संशयित आरोपींनी त्याला कारमध्ये टाकून निर्जनस्थळी नेले.

थोरात याला निर्जनस्थळी नेऊन त्याचा निर्घृण खून करण्यात आला. खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी व अनिल याने आत्महत्या केल्याचा बनाव रचून तसे भासविण्यासाठी हातवन शिवारातील वनविभागाच्या छोट्या तलावात एका झाडाला गळफास लावून त्याचे शव लटकून दिले.

हा प्रकार नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर मौजपुरी पोलिसांना माहिती देण्यात आली.

हा खून पूर्ववैमनस्यातून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. परतूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजू मोरे, सपोनि. विलास मोरे यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली.मौजपुरी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भादंवि. 302, 120(ब), 365, 341, 201, 143, 147, 149,323,504, 506, आणि ॲट्रॉसिटी कायद्याच्या 4(1), 1 (S), 3(2)(VA) (अ) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवऱ्याने हातउसने घेतलेले पैसे न दिल्याने महिला आत्महत्येसाठी रुळावर, पण त्याचवेळी....

औरंगाबाद : गरजेसाठी पती आणि भावाने हातउसने घेतलेले पैसे परत न दिल्याने एका विवाहित महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला. ही २६ वर्षीय महिला दोन मुलांना सोडून संग्रामनगर येथील रेल्वेमार्गावर पोहोचली असता, मेट्रो औरंगाबाद असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यासह देवानगरी भागातील नागरिकांनी धाव घेतल्याने, मोठा अनर्थ टळला आणि तिचा जीव वाचला. ही घटना शनिवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास घडली.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, रागाच्या भरात महिला आत्महत्या करण्यासाठी रेल्वेमार्गावर पोहचली. याचवेळी तिला वाचविण्यासाठी तिच्या पाठोपाठ तिचे वडील आणि नवराही धावून आला. या दोघांनाही ही महिला जवळ येऊ देत नव्हती. ही घटना पाहिल्यानंतर देवानगरी भागातील मेट्रो औरंगाबाद असोसिएशनचे श्रमंत गोर्डे पाटील व त्यांच्यासोबत अन्य काही जणांनी रेल्वेमार्गाकडे धाव घेतली. तर याचवेळी नेत्रा जोशी आणि मीनाक्षी सोनवणे या महिलांनी आत्महत्या करण्यासाठी



आलेल्या महिलेशी बोलत तिचं मन परिवर्तन करून तिला बाजूला आणले आणि काही मिनिटांनंतर तेथून रेल्वे निघून गेली.

तिची चौकशी केली असता, ती स्वयंपाक आणि धुणी-भांड्याची कामे करते. तिने काही जणांकडून उसने पैसे घेऊन भावाला ४० हजार आणि नवऱ्याला १५ हजार रुपये दिले होते.

मात्र, दोघांनीही पैसे परत न केल्यामुळे तिने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. यावेळी उपस्थित नागरिकांनी तिची समजूत काढली. तसेच, पैसे परत करण्याची हमी नवरा आणि वडिलांनी दिली. त्यानंतर ती महिला घरी निघून गेली.

**दोन दिवसांपासून घरात वाद**

महिलेने दिलेले पैसे भावाने शेअर मार्केटमध्ये गुंतवल्याचे सांगितले. दोन दिवसांपूर्वी हा विषय महिलेच्या वडीलांसमोर आला. शेअर मार्केट पडल्यामुळे तोट्यात आल्याचेही भावाने सांगितले. यानंतर पैशावरून घरात वाद सुरू होता. जीव देण्याची धमकी महिलेने दिल्याने, नवरा व वडील दोन दिवसांपासून घरातच होते. शनिवारी तिने पाच आणि दोन वर्षांच्या दोन्ही मुलांना घरी सोडले. जीव देण्यासाठी रेल्वे रूळाकडे निघाली होती. मात्र स्थानिकांनी पुढाकार घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

पृष्ठ १ वरुन

### एनसीबी अधिकारी असल्याचे सांगत

राहणाऱ्या २८ वर्षीय अभिनेत्रीने २३ डिसेंबर रोजी तिच्या राहत्या घरी आत्महत्या केली कारण तिला आरोपींनी धमकी दिली होती. अभिनेत्रीच्या मृत्यूनंतर तिच्या मैत्रिणीने घडलेल्या सर्व प्रकाराबाबत पोलिसांना माहिती दिली.याप्रकरणी आंबोली पोलिसांनी स्वत:हून दखल घेत एफआयआर दाखल केला आहे. ती अभिनेत्री अलीकडेच एका हॉटेलमध्ये तीन मित्रांसह एका पार्टीत गेली होती. तिथे दोघांनी एनसीबी अधिकारी म्हणून तिच्याकडे गेले आणि तुला ड्रग्ज घेतल्याबद्दल अटक केली जाईल, असे सांगितले. "मृत अभिनेत्री आणि तिचे मित्र घाबरले आणि त्यांनी त्यांना यातून सोडवण्याची विनंती केली. आरोपींनी ४० लाख रुपयांची मागणी केली आणि शेवटी २० लाखांवर सेटलमेंट केली, "असे एका अधिकाऱ्याने सांगितले. अभिनेत्रीच्या मैत्रिणीने पोलिसांना सांगितले की, ती नैराश्यात गेली होती आणि एवढ्या मोठ्या रकमेची व्यवस्था न झाल्यामुळे ती खूप तणावात होती. या अभिनेत्रीचा एक मित्र, असीर काझी, जो तिच्यासोबत पार्टीत होता, तो देखील या खंडणी रॅकेटचा भाग होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी सूरज परदेशी (३२) आणि प्रवीण वळिंबे (२८) यांना एनसीबीचे अधिकारी असल्याचे भासल्याचे दाखवल्याच्या कारणावरून अटक करण्यात आली. काझी आणि अन्य आरोपी सापडत नसल्याचे पोलिसांनी सांगितले. आयपीसीच्या कलम ३०६ १७०, ४२०, ३४४, ३८८, ३८९, ५०६, १२०(ब) अंतर्गत तोतया एनसीबी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या

कंत्राटी कंपनीला मुदतवाढ का दिली? या प्रश्नावर उत्तर देताना चव्हाण म्हणाले की मुदतवाढ देण्यासाठी मी स्वतः ९ ते १० बैठका घेतल्या आहेत. ९ जुलै २०२१ रोजी १ वर्षाची मुदतवाढ या प्रकरणात देण्यात आली आहे. मुदतवाढ न दिल्यास नव्याने कंपनी निवडण्याची वेळ येईल. त्यामुळे नव्याने प्रक्रिया राबविली तर ही प्रक्रिया वेळखाऊ असल्याचे मत अशोक चव्हाण यांनी मांडले. एल अँण्ड टी कंपनीला २०१८ ते २०२१ असा ३६ महिन्यांचा कालावधी या स्मारकाच्या बांधकामाच्या कामासाठी देण्यात आला होता. परंतु न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्याने तसेच काही परवानग्या शिल्लक असल्याने हे काम रखडले असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. त्यामुळे ववर्क ऑर्डरचा ३६ महिन्यांचा कालावधी कमी करता येईल का? असा प्रयत्न असेल असाही खुलासा त्यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण उच्च न्यायालयात वर्ग केले आहे. मच्छीमार समाजाची जनहित याचिका, जैवविविधता याचिका आणि जनसुनावणी न घेणे आणि कॅंगचे ताशेरे यासारखी प्रकरणे असल्यानेच या स्मारकासाठीच्या परवानग्या रखडल्या आहेत. त्यामुळेचलया परवानग्या मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष कानाला सुरूवात होईल असेही ते म्हणाले.

### उमरगा पोलिसांनी सापळा रचून

दुपारी चार-पाचच्या सुमारास हैदराबादहून मुंबईकडे जाणाऱ्या आयशर टेंपो एमएच २४ जे ७४५६ अडवून टेंपो चालकाकडे चौकशी केली. सुरुवातीला टेंपो चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांना संशय आला. त्यामुळे टेंपोचालक व टेंपोची कसून तपासणी केली असता तपासणीमध्ये गुटख्याची ४५ गोणी आढळून आल्या. त्यामध्ये जवळपास २२ लाख १६ हजार १६० रुपयांचा बनावट गुटखा सापडला आहे. टेंपोची किंमत अंदाजे ५ लाख आहे. पोलिसांच्या या कार्यवाहीत एकूण २७ लाख १६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. टेंपोचालक लक्ष्मण रोहिदास राऊत, राहणार अनाळा ता. परंडा याला ताब्यात घेतले असून यासंबंधी अन्नभेसळ अधिकाऱ्यांना कल्पना देण्यात आले आहे.

### पुण्यात बंटर शाळेच्या

करणाऱ्या डंपर चालकाला ताब्यात घेतले. अपघाताच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी झाली होती, तर सासवड रोडवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. हडपसर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी डंपर बाजूला घेऊन वाहनांना मार्ग मोकळा करून दिला. प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले की, पादचारी रस्त्यावर पडलेल्या तंबाखूची पुडी उचलण्यासाठी गेला होता. पाठीमागून एका दुचाकीने त्याला धडक दिली. यानंतर डंपरने धडक देऊन तो डंपरच्या खाली अडकला. डंपरने त्याला तीस फूट फरफटत नेले. यामध्ये पादचाऱ्यांच्या पायाचा चेंदामेंदा झाला.

### कणकवली पोलिसांकडून

आलेल्या दोघांनी चाकूने वार केल्याने परब जखमी झाले होते. रविवारी कणकवली पोलिसांनी भाजप आमदार नितेश राणे (Nitesh Rane) यांना चौकशीसाठी बोलावले होते. अर्धा तास चौकशी करुन त्यांना जाऊन देण्यात आले होते. मात्र, संतोष परब (Santsoh Parab) यांच्यावरील हल्ल्याचे खरे सूत्रधार नितेश राणे आणि गोट्या सावंत असल्याचा आरोप शिवसेनेने केला होता. त्यामुळे याप्रकरणात नितेश राणे यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेकडून केली जात आहे. 'सूड भावनेने कारवाई झाल्यास न्यायालयात जाऊ' संतोष परब यांच्यावरील हल्लाप्रकरणी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना प्रतिक्रिया विचारणा करण्यात आली. तेव्हा त्यांनी नितेश राणे हे अज्ञातवासात नसल्याचे स्पष्ट केले. नितेश हे सिंधुदुर्गातच आहेत. ते आमदार आहेत. अज्ञातवासात जायची आम्हाला काही गरज नाही, असे नारायण राणे यांनी सांगितले. आमच्यावर सूडाच्या भावनेने आरोप केले जात असतील तर कोर्टात तर जावे लागेल. असरकारला काय करायचं ते करु द्या. नितेश राणेंनी काहीही केलं नाही. त्यांनी कोणाला मारलं नाही, असेही नारायण राणे यांनी सांगितले. सभागृहात नितेश राणेंच्या निलंबनाची मागणी राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांची खिल्ली उडवल्याप्रकरणी शिवसेनेकडून

### राज्यात निर्बंध लावल्यानंतर

दिवसांपूर्वी आपण दिवसाला आठ लाख डोसेस देत होतो, सद्या पाच लाख डोसेस दिवसाला दिले जात आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सर्व पालकमंत्र्यांनी पाठपुरावा करून आपापल्या जिल्ह्यांत लसीकरण वेगाने होईल असे पाहण्याचे निर्देश दिले. डॉ व्यास यांनी यावेळी अधिक माहिती देताना सांगितले की, "८ डिसेंबरला ६२०० सक्रिय रुग्ण होते . मात्र आज १० हजार सक्रिय रुग्ण आहेत. एकूणच गेल्या २० दिवसांत सक्रिय रुग्णांमध्ये ५० टक्के वाढ झाली असून मागील सहा दिवसांत रुग्णांच्या संख्येत तिपटीने वाढ झाली". राज्यात पॉझिटिव्हिटी रेट १.०६ टक्के झाल्याचंही ते म्हणाले आहेत. तूर्त रात्रीची जमावबंदी; उपाहारगृहे, सभा-समारंभ, विवाह सोहळयांमधील उपस्थितीवर निर्बंध करोनाची वाढती रुग्णसंख्या आणि ओमायक्रॉनचा वाढता प्रादुर्भाव यामुळे गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात काही नवे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार रात्री ९ ते सकाळी ६ पर्यंत पाच किंवा त्यापेक्षा अधिक लोकांनी सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे.विवाहसोहळे, धार्मिक, सामाजिक, राजकीय कार्यक्रमांमध्ये उपस्थितीवर नियंत्रण आणण्यात आले आहे.

### विधानसभाध्यक्ष निवडणूक अधांतरी

मान्यता देतील, अशी आम्हाला आशा आहे, अशी अपेक्षा बाळासाहेब थोरात यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. विधानसभा अध्यक्षपद वर्षभर रिक्त असून करोनामुळे निवडणुकीस उशीर झाला. पण, ही निवडणूक लवकरात लवकर घ्यावी, यासाठी राज्यपालांनी दोनदा पत्रे पाठविली होती. त्यामुळे आता त्यांनी तातडीने निवडणूक कार्यक्रमास मान्यता द्यावी, अशी विनंती या नेत्यांनी राज्यपालांना केली. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक राज्यपाल रोखणार नाहीत, अशी अपेक्षा थोरात यांनी व्यक्त केली. राज्यात १९६० पासून अध्यक्ष निवडणुकीसाठी असलेला गुप्त मतदानाचा नियम महाविकास आघाडी सरकारने बदलून ही निवडणूक खुल्या किंवा आवाजी पद्धतीने घेण्याची तरतूद केली. लोकसभेतही आवाजी मतदानाने अध्यक्षांची निवड होते. तीच पद्धत आम्ही अवलंबिणार असल्याचे थोरात यांनी स्पष्ट केले.

संपादकीय...



# औषधांचा आजार!

भारतातील निम्म्यापेक्षा अधिक कुटुंबांत औषध सेवनाचा अतिरेक होतो असे एका पाहणीत आढळले यात अजिबात आश्चर्य नाही. एका वेळी एकापेक्षा अधिक -खरे तर किमान पाच- औषधे घेत असलेल्यांची वर्गवारी 'पॉलीफार्मसी' या गटात केली जाते. म्हणजे बहुऔषधजीवी. ही अशी बहुऔषधे घेण्यामागे बरीच कारणे असू शकतात. वृद्धत्व, त्यामुळे झालेली प्रकृतीची गुंतागुंत आणि अनेक आजार आदी. यामागील काही नैसर्गिक कारणे. एका अर्थी हे योग्यही. म्हणजे एखाद्यास दुर्दैवाने व्याधीच अनेक असल्या तर तो तरी बिचारा काय करणार? तेव्हा प्रत्येक बहुऔषधजीवी हा औषधांचा गैरवापर करणारा असेलच असे नाही. पण त्याच वेळी हेही खरे की अनेक औषधे घेणाऱ्या



प्रत्येकालाच इतक्या औषधांची गरज असेलच असे नाही. भारताबाबत हे विधान प्रकर्षाने खरे ठरते. याबाबतच्या आंतरराष्ट्रीय पाहणीतील निष्कर्षानुसार निम्म्याहून अधिक भारतीय हे जरुरीपेक्षा अधिक औषधांचे सेवन करीत असल्याचे आढळले. यात ही औषधे ज्यांनी घेणे आवश्यक आहे असा वर्ग आहेच. पण त्याचबरोबर गरज नसतानाही फुकाफुकी गोळ्या/काढे येता-जाता तोंडात टाकणाऱ्यांचाही मोठा वर्ग आपल्यात आहे हे नाकारता येणारे नाही. याच बरोबरीने एक मोठा वर्ग आपल्याकडे असाही आहे की ज्यास नवनव्या औषधांचे प्रयोग करणे आवडते आणि त्याची ही औषध शोधयात्रा अखंड सुरूच राहते. या वर्गाचे वैशिष्ट्य असे की हा स्वयंसिद्धा औषधसेवी इतरांच्याही डोक्यात या कथित औषधाचे गुणधर्म घुसवतो आणि हे ऐकणारा विचाराने हलका असेल तर त्यातून औषधाच्या दुरुपयोगासाठी आणखी एक बाटतो. या पाहणीच्या निमित्ताने औषधसेवनाच्या आजारावर भाष्य करणे आरोग्यासाठी आवश्यक.

या औषधातिरेकामागे तीन प्रमुख कारणे संभवतात. वैद्यक सल्ला घेणे वेळेने आणि पैशाने परवडत नाही म्हणून थेट औषध दुकानांतूनच औषधे घेणारे पहिले. हा वर्ग प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतो. त्यामुळे त्यांच्या औषधातिरेकामागे समर्थनीय नसले तरी एक कारण आहे. दुसरा वर्ग आर्थिकदृष्ट्या सुस्थितीतील अर्धवटरावांचा. या वर्गात दोन घटक आहेत. पहिला वैद्यकाचे जवळचे नातेवाईक, म्हणजे वैद्यकाचे आई/ वडील/ भाऊ-बहीण वगैरे. आपले कुटुंबीय डॉक्टर आहेत या अनुभवावर हा वर्ग बेलाशकपणे इतरांस काहीबाही औषधे सुचवत असतो. अशी मंडळी आसपास सहज दिसतील. यातील दुसरा घटक म्हणजे गुगलादी माध्यमांद्वारे स्वत:च 'संशोधन' करून स्वत:च स्वत:ला वा निकटवर्तीयांस औषधे सुचवणारा. या वर्गाचा उच्छाद अलीकडे फारच वाढू लागलेला आहे. गूगल काय किंवा काही विख्यात रुग्णालयांच्या वेबसाइट्स काय. त्यात विविध आजारांसंबंधी लक्षणांच्या 'लसावि'आधारे माहिती आणि क्वचित संभाव्य उपचार असतात. बऱ्याच आजारांची प्राथमिक लक्षणे सारखी आढळतात. पण त्याआधारे उपचार सुचवताना रुग्णाची शारीरिक स्थिती तपासणे महत्त्वाचे असते. या दोन्हींच्या आधारे मग औषध सुचवले जाते. पण गूगलवीर मात्र स्वत:च स्वत: काहीबाही घेत बसतात. महाजालातील फुकट्या माहितीच्या आधारे उपचार करता येत असते तर आज देशातील १३० कोटींतील किमान १०० कोटी स्वत:स वैद्यकच म्हणवते. पण हेही कळण्याइतका विवेक या मंडळींच्या ठायी नसतो. म्हणून या वर्गाकडूनही औषधांचे दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर होतात.

होण्यास तिसरा कारणीभूत घटक म्हणजे खुद्द वैद्यकीय पेशा. औषध निर्मात्या कंपन्या आणि वैद्यक यांचे साटेलोटे हे आधुनिक कालातील दुर्दैवी आणि उघड गुपित आहे. यातील पहिल्यास स्वत:ची उत्पादने तेवढी विकण्यात रस आहे आणि वैद्यकांस आपली गुंतवणूक लवकरात लवकर दामदुप्पट मिळवणे महत्त्वाचे आहे. या क्षेत्रातील सर्वच वैद्यक असे आहेत असे अजिबातच नाही. पण औषधनिर्मात्या कंपन्यांशी हातमिळवणी करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे हे निश्चित. वैद्यकांस महागड्या, चैनीच्या वस्तूंच्या भेटी देण्यापासून सर्व 'सुख'सोयी देऊ करणाऱ्या परदेशी सहलींपर्यंत अनेक आमिषे या कंपन्यांकडून दाखवली जातात. यामागील कारण एकच. सदर वैद्यकाने आपल्या कंपनीच्या औषधाची शिफारस आपापल्या रुग्णांस करावी. याचा अर्थ असा की आपणास शिफारस केली जाणारी अनेक औषधे आपल्या शारीरिक गरजेपेक्षा वैद्यक आणि औषध कंपनीच्या आर्थिक निकडीवर आधारित असतात. यातूनच हृदयरुग्णांच्या रक्तवाहिन्या रुंदावण्यासाठी एका विशिष्ट कंपनीची धातूची रिंग (स्टेन्ट) वापरण्याचा गैरव्यवहार अनेकांस स्मरेल. वास्तविक त्यापेक्षा अन्य बनावटीची रिंग किती तरी स्वस्त होती.

# चिलीची नवी पालवी!



'मिलेनियल लेफ्ट' असे नवीन सहस्राकात विशीपंचविशीचे झालेल्या नववाम पिढीला संबोधले जाते. चिलीचे नवनिर्वाचित अध्यक्ष गॅब्रिएल बोरिक हे अशा पिढीचे 'आयकॉन'. नवीन सहस्राकातील नवलाईच्या बाबी अनेक. उदा. कृत्रिम प्रज्ञा (एआय), कूटचलन (क्रिप्टोकरन्सी), इंटरनेट ऑफ थिंग्ज वगैरे. 'मिलेनियल लेफ्ट' हे प्रकरणही याच यादीत समाविष्ट करावे इतके अद्भुत ही विचारसरणी कालबाह्य आणि मृतवत झाली असल्याची बाजारपेठाभिमुख तथाकथित मुक्त विचारसरणीच्या मंडळींची खात्री आणि आशाही. उजव्या विचारसरणीच्या मंडळींसाठी – विशेषत: अमेरिका खंडात – लाल बावटा म्हणजे जगबुडीचा इशाराच. गेल्या अमेरिकी निवडणुकीत तर समोरचा उमेदवार किती 'लाल' किंवा डावीकडे झुकलेला हा निवडणुकीचा मुद्दा बनला होता. या पार्श्वभूमीवर बोरिक यांची निवडणूक अभ्यासाचा मुद्दा ठरतो. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे ते डावे असले, तरी नवीन सहस्राकातील पिढीला आपले वाटावेत असेच. चिलीच्या पार्लमेंटमध्ये २०१४ मध्ये ते पहिल्यांदा निवडून आले, त्या वेळी रॉक बँड टी-शर्ट, जीन्स आणि दर्शनी भागावर अनेक टॅटू गोंदून पहिल्या दिवशी अवतरले! ते ध्यान पाहून त्यांच्या पक्षातील अनेक पोथिनिष्ठ डाव्यांना त्या दिवशी धक्कायुक्त आवंढा गिळावा लागला होता असे सांगतात. फिडेल कॅस्ट्रा किंवा चे गवेरा यांच्याप्रमाणेच गॅब्रिएल बोरिक यांच्याकडेही समकालीन तरुण पिढीला भुरळ पाडण्यासारखे व्यक्तिमत्त्व नक्कीच आहे. पण केवळ त्यांचे उद्दिष्ट असेल हे संभवत नाही. वयाच्या ३५व्या वर्षी चिलीच्या अध्यक्षपदावर निवडून आलेले ते सर्वांत तरुण उमेदवार. ब्रॉड फ्रंट नामे डाव्या आघाडीचे नेतृत्व ते करतात. या आघाडीत काही डाव्या पक्षांचा आणि चळवळींचा समावेश आहे. जगभर त्यांच्याइतक्या कमी वयात राष्ट्रप्रमुखपदी निवडून आलेले थोडकेच असतील. चिलीच्या इतिहासातील ही सर्वाधिक ध्रुवीकरण पाहिलेली निवडणूक ठरली. बोरिक यांचे प्रतिस्पर्धी होजे अंतोनियो कास्ट यांनी बोरिक यांच्या डाव्या विचारसरणीला प्रचारादरम्यान लक्ष्य केले. हे कास्ट चिलीचे कुख्यात माजी हुकूमशहा ऑगस्टो पिनोशेट यांचे चाहते. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही त्यांचे आदर्श. पिनोशेट यांनी अमेरिकेच्या मदतीने चिलीमध्ये लष्करी बंड घडवून आणले आणि १९७३ ते १९९० अशी १७ वर्षे निरंकुश सत्ता उपभोगली. त्या काळात कोणत्याही प्रकारचा राजकीय विरोध चिरडून टाकण्यात आला नि 'लोकशाहीचे जागतिक ठेकेदार' असलेल्या अमेरिकेने इतर काही दक्षिण अमेरिकी देशांप्रमाणेच चिलीमध्येही लोकशाहीचे पाय छाटण्याकामी भूमिका उत्तम निभावली!

बोरिक यांनी प्रतिस्पर्ध्याची विचारसरणी किती फॅसिस्ट आहे वगैरे पठडीतला डावा प्रचार केला नाही. चिलीतील आर्थिक विषमता कमी करू, श्रीमंतांवर अधिक कर आकारू, सामाजिक सुरक्षा योजनांची व्याप्ती वाढवू आणि अर्थव्यवस्था शाश्वत व हरित विकासाभिमुख करू ही त्यांची आश्वासने विशेषत: युवा पिढीला भावली. त्याहीपेक्षा त्यांना भावला असावा, बोरिक यांनी नकारात्मक चिखलफेक प्रचाराचा प्रयत्नपूर्वक टाळलेला मार्ग! जगभरातील निवडणुकांमध्ये हल्ली 'समोर आहेच कोण?' किंवा 'अमक्याला निवडाल तर सर्वनाश अटळ!' या ठेवणीतल्या सूत्रांपलीकडे प्रचार जातच नाही. फारच थोड्यांकडे स्वत: काय करणार याविषयी सांगण्यासारखे असते. 'ब्रॉड फ्रंट' आघाडीत बोरिक यांना आव्हान देऊ शकतील असे काही होते. त्यातही सँटियागो या राजधानीच्या शहराचे महापौर डॅनिएल जादेयू हे प्रमुख. परंतु युवा मतदारांचा वाढता टक्का पाहून बोरिक यांना संधी मिळाली. वस्तुत: त्यांच्या मते ते मध्यममार्गी म्हणजे डाव्यांच्या नजरेतून 'उजवे'च! अनेक आर्थिक निकषांवर सधन असूनही चिलीमध्ये आर्थिक विषमताही तितकीच भीषण आहे. या विषमतेतून साहजिक उद्भवणाऱ्या असंतोषाच्या लाटेवर स्वार होऊन बोरिक अध्यक्षीय निवडणूक जिंकू शकले. २०१९ पासून चिलीमध्ये प्रचंड निदर्शने सुरू आहेत. चिलीमध्ये नवीन राज्यघटना बनवण्याची प्रक्रिया सुरू असून, विषमतेवर काही घटनात्मक उपाय शोधले जातील अशी अपेक्षा आहे. बोरिक हे समाजवादी असतील, तर ते नेमक्या कोणत्या डाव्या दिशेला जाणार याविषयी चर्चा सुरू झाली आहे. त्यांना स्वत:ला दक्षिण अमेरिकेतील इतर काही देशांनी राबवलेल्या साम्यवादवजा समाजवादी राजवटींपेक्षा युरोपातील कल्याणकारी व्यवस्थेला प्राधान्य देणारे काही पश्चिम युरोपीय देश आदर्शवत वाटतात. उदा. सध्याचे जर्मनी आणि फ्रान्स. परंतु कल्याणकारी व्यवस्था राबवताना वित्तीय बेशिस्तीलाही फाटा द्यावा लागतो. कल्याणकारी राज्य याचा अर्थ मूलभूत सुविधा सर्व स्तरांना परवडण्याजोग्या दरात उपलब्ध करून देणे. मात्र 'गरिबांना आम्हीच पोसणार' असा एकाच वेळी घमेंडखोर प्रतिपाळभाव आणि आर्थिकदृष्ट्या अडाणी पवित्रा नव्हे. कास्ट यांनी बोरिक यांना याच मुद्द्यावरून लक्ष्य केले होते. 'क्युबा, व्हेनेझुएला आणि निकाराग्वा या देशांच्या वाटेने हे चिलीला घेऊन जातील. अशा साम्यवादी राजवटी गरिबीचा प्रसार करतात, ज्याला कंटाळून लोकांना असे देश सोडून पळून जावेसे वाटते' असा स्पष्ट उल्लेख कास्ट यांच्या भाषणात होता. त्यांच्या या पवित्र्यामुळे काही मतदार त्यांच्या गळाला लागले असतीलही. परंतु मतदारही इतरत्रही पाहात असतातच. विशेषत: युवा मतदार. वरकरणी नवउदारमतवाद तरी प्रत्यक्षात संकुचित व प्रतिगामी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या सरकारांनी विशेषत: करोनाच्या महासाथीमध्ये जनतेशीच कशी फसवणूक केली हे प्रामुख्याने अमेरिका, ब्राझील आणि ब्रिटन या देशांमध्ये दिसून आले. तेव्हा कास्ट यांचा चिलीयन राष्ट्रवाद आणि साम्यवादी भयाख्यान पुरेशा मतदारमानसाला स्पर्शू शकले नाही.

दक्षिण अमेरिकेतील अनेक देश समाजवादी वा साम्यवादी असतील, याचा अर्थ त्यांचा परस्परांमध्ये भ्रातृभाव आहे असे समजण्याचे कारण नाही. बोलिव्हिया, व्हेनेझुएला, मेक्सिको, ब्राझील, अर्जेंटिना अशा देशांतील डाव्या नेत्यांनी बोरिक यांचे स्वागत केले. तरी क्युबाचे शासक मिग्युएल डियाझ कानेल आणि निकाराग्वाचे नेते डॅनिएल ऑर्तेगा यांनी प्रतिक्रियाच दिली नाही. ते साहजिकच आहे. कारण याच दोन्ही नेत्यांना बोरिक यांनी लक्ष्य केले होते. ऑर्तेगा चौथ्यांदा निवडून आले त्या वेळी 'निकाराग्वाला लोकशाहीची गरज आहे. बनावट निवडणुका आणि विरोधकांच्या गळचेपीतून हे साधणार नाही' असे उद्गार बोरिक यांनी काढले होते. क्युबात सरकारविरोधी निदर्शकांप्रति बोरिक यांनी सहानुभूती व्यक्त केली होती. तेव्हा चिलीला कोणत्या दिशेने न्यावयाचे आहे याविषयी बोरिक यांच्या मनात काही ठोस संकल्पना आहेत.

तसे पाहायला गेल्यास चिली हा जागतिक राजकारण वा अर्थकारणाच्या परिप्रेक्ष्यात फार मोठा देश नाही. पण येथे जे घडून आले, त्याचे गुणधर्म वैश्विक आहेत. कल्याणकारी अर्थवादाविषयी आजही जनतेच्या मनात आकर्षण आहे.

# कल्याणमध्ये दुचाकी उभी करण्यावरून वाद, पोलिसाला चौघांची बेदम मारहाण




कल्याण : अंबरनाथमध्ये लष्करी जवानाला मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच कल्याणमध्ये चौघांच्या टोळक्याने पोलिसांना बेदम मारहाण केली. याप्रकरणी चौघांपैकी दोघांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली असून इतर फरार दोघा आरोपींचा शोध घेतला जात आहे. सुरक्षा यंत्रणांतील जवानांना मारहाण होण्याचे प्रकार वारंवार घडू लागल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

**दुचाकी बाजूला उभी करण्यावरून वाद**

रस्त्यावर दुचाकी उभी करून फोनवर बोलत असताना पोलीस कर्मचाऱ्याचा काही तरुणांसोबत वाद झाला. या वादानंतर चौघांनी मिळून मुंबई पोलीस दलातील कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली. या घटनेदरम्यान सोन्याची चेन आणि काही रोख रक्कमसुद्धा गहाळ झाली आहे. याप्रकरणी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चौघांपैकी दोघांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे, तर इतर दोघा आरोपींचा शोध सुरू आहे.

**मारहाण झालेला जवान मुंबई पोलीस दलातील**

चौघांच्या टोळक्याने मारहाण केलेले पोलिस शिपाई विश्राम महाजन हे मुंबईतील दादासाहेब भडकम मार्ग पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत. ते शनिवारी रात्री सव्वा दहाच्या सुमारास गावदेवी रोडवरून कल्याण पश्चिमेकडे असलेल्या बँकेच्या एटीएममध्ये घराचा हप्ता भरण्यासाठी दुचाकीवरून जात होते. नेतीवली सर्कलजवळ आले असता त्यांना फोन आला. त्यामुळे फोनवर बोलण्यासाठी त्यांनी गाडी बाजूला लावली. ते फोनवर बोलत होते. इतक्यात तेथे दुचाकीवरुन आणि रिक्षातून आलेल्या चौघांनी महाजन यांना गाडी पुढे घेण्यास सांगितले. यावरून वाद झाला आणि चौघांनी मिळून महाजन यांना बेदम मारहाण केली.

**झटापटीदरम्यान दागिने आणि रोकड गहाळ**

झटापटीदरम्यान महाजन यांच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि खिशातील 15 हजारांची रोख रक्कम गहाळ झाली. या घटनेनंतर पोलिस शिपाई विश्राम महाजन यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी हल्लेखोर चौकडीवर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील चौघांपैकी दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

# दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एकजण जागीच ठार, 3 गंभीर जखमी

गडचिरोली: आलापल्ली-सिरोंचा महामार्गावर असलेल्या गोलाकर्जी गावाजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक बसली. यात एकाच जागीच मृत्यू झाला तर ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. गंभीर जखमींना अहेरी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करुन उपचार करण्यात येत असून सदर घटनेची नोंद पोलीस स्टेशन अहेरी येथे करण्यात आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, आज दुपारच्या सुमारास अहेरी तालुक्यातील अर्कापल्ली येथील रहिवासी दिनेश आत्राम (२४), रामसाई सोयाम (६५), नागार्जुन आत्राम (१२) एम.एच. ३३ ए १५०६ या दुचाकी वाहनाने गुंडापल्ली येथे जात होते. तर त्यांच्या विरुद्ध दिशेने एटापल्ली येथील रहिवासी अरुण तेलकुंटलावार हे वाहन क्र. एम.एच. ३३ ए २३७० ने सिरोंचाकडे काही कामानिमित्य जात असतांना गोलाकर्जी गावाजवळ दोन्ही दुचाकीस्वाराची समोरासमोर जोरदार धडक बसली. या धडकेत अरुण तेलकुंटावार यांचा जागीच मृत्यू



झाला. तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ₹माझी वसुंधरा₹ अभियान अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिका आयोजित सायक्लोथॉन २०२१ चा शुभारंभ दिनांक ३० डिसेंबर २०२१

## पंचतत्वावर आधारित असलेल्या मूल्यांच्या माहितीची जनजागृती करणेकामी महानगरपालिकामार्फत सायक्लोथॉन २०२१ स्पर्धेचे आयोजन

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या "माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या "माझी वसुंधरा" उपक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित सायक्लोथॉन २०२१ चा शुभारंभ दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता होणार आहे. सायक्लोथॉन २०२१ चा शुभारंभ भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदान येथे मा. महापौर व आयुक्त यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच या स्पर्धेस भाग घेणाऱ्या स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी नामवंत कलाकार देखील उपस्थित राहणार आहे. जल, अग्नी, वायू, पृथ्वी व आकाश या पंचतत्वावर आधारित असलेल्या मूल्यांच्या माहितीची जनजागृती करणेकामी महानगरपालिकामार्फत सायक्लोथॉन २०२१ आयोजित करण्यात येत आहे.

> वसुंधरेचे रक्षण, इंधानाची बचत, हरितवायू या सर्वांसाठी हा एक दिवस आपण या शहराचे जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडूया – आयुक्त दिलीप ढोले

स्पर्धेची सुरुवात सुभाषचंद्र बोस मैदान येथून होणार असून, काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून पुन्हा सुभाषचंद्र बोस मैदान येथे समाप्त करण्यात येणार आहे. या स्पर्धेत वयोगट पहिला गट वयवर्ष १२-२५ (स्त्री-पुरुष) व खुलागट वयवर्षे २५ व त्यापुढील (स्त्री-पुरुष) असे दोन गट ठेवण्यात आले आहेत. तसेच सदर वयोगटानुसार स्पर्धकांना सन्मानचिन्ह व स्वतंत्र पारितोषिक देखील ठेवण्यात आले आहे. तसेच स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात सर्व स्पर्धकांसह महापालिका मा. महापौर, आयुक्त, सर्व पदाधिकारी, सर्व अतिरिक्त आयुक्त, सर्व उपायुक्त, महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत "माझी वसुंधराची" हरित शपथ घेण्यात येणार आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी सायक्लोथॉन २०२१ या स्पर्धेत आवर्जून सहभाग घेण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका




अधिकृत फेसबुक, इंस्टाग्राम व ट्विटर पेज फॉलो करून त्याठिकाणी दिलेल्या गूगल फॉर्म लिंक वर क्लिक करून स्पर्धेत भाग घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरावा किंवा www.mbmc.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन ऑनलाईन अर्ज भरावा असे आवाहन महापालिका प्रशासन मार्फत करण्यात येत आहे.

शहरातील नागरिकांनी पर्यावरण आणि निसर्ग याविषयी संवेदनशील बनणे, नैसर्गिक साधन संपत्तींचे संवर्धन करणे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे शहरांमध्ये राहून देखील धकाधकीचे आयुष्य जगत असताना पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करून निसर्गाशी जोडलेली आपली नाळ घट्ट करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सायक्लोथॉन २०२१ मध्ये शहरातील जबाबदार नागरिक म्हणून जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन मा. महापौर श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे व आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# उत्तर महाराष्ट्रात अलीबाबाची गुहा!

## तब्बल 32 ठिकाणी कारवाई, 175 अधिकाऱ्यांनी 12 तास मोजला पैसा

नाशिकः उत्तर महाराष्ट्रात आयकर विभागाला अक्षरशः अलीबाबाची गुहा सापडली आहे. नाशिक, धुळे, नंदुरबारमध्ये एकूण 175 अधिकाऱ्यांनी तब्बल 32 ठिकाणी कारवाई केली. या ठिकाणी सापडलेला पैसा 12 तास मोजला आणि संपत्तीची एकूण मोजणी करायला तब्बल 5 दिवस लागले. येणाऱ्या काळात हे कारवाई सत्र पुन्हा वाढेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बडे मासे अस्वस्थ झाले असल्याची चर्चा सुरू आहे.

उत्तर महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात केलेली कारवाई सध्या कुतुहलाचा विषय झाली आहे. इतकी मोठी कारवाई तब्बल पाच दिवस चालली. मात्र, त्याची साधी खबरही बाहेर आली नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. खरे तर तब्बल 175 अधिकाऱ्यांनी एकचावेळी 32 ठिकाणी ही कारवाई केली. त्यामुळे कुणालाही हलचाल करता आली नाही. बडे मासे आपाओप जाळ्यात अडकले. विशेषतः ज्यांच्यानावार या बड्या माशांनी संपत्ती घेऊन



ठेवली आहे, त्यांनाही धरल्यामुळे साऱ्या नाड्या एकत्रित आवळल्या गेल्या.

बाहेर पडूच दिले नाही...

नाशिक, धुळे, नंदुरबारमध्ये आयकरने छापे टाकल्यानंतर घर, कार्यालये सील केले. आतून बाहेर आणि बाहेरून आत कुणालाही प्रवेश दिला नाही. त्यामुळे कोण लोक आलेत, कशासाठी आलेत, याचीही काहीही माहिती कोणालाही नव्हते. शिवाय संपर्काची साधनेही काढून घेतली गेली.

त्यामुळे आपल्या शेजारच्या घरात पाहुणे आले असतील, म्हणून इतर शेजारीही शांत होते. मात्र, पाहुणे पाच दिवस राहिले आणि मोठा धमाका करून गेले, अशी अवस्था आता झाली आहे.

**गडगंज माया सापडली**

आयकर विभागाने केलेल्या कारवाईत जवळपास 240 कोटींची संपत्ती सापडल्याचे समजते आहे. त्यात सहा कोटींची रोकड होती. हा पैसा मोजायला बारा तास लागले. सोबत पाच कोटींचे दागिने सापडले. त्यात मौल्यवान रत्नांच्या अंगठ्या, हिरे अशी मालमत्ता असल्याचे समोर येत आहे. विशेषतः सोन्याच्या बिस्कटांचे प्रमाण मोठे होते. अनेक मोठे मास अजूनही रडावर असून, त्यांच्यावर कधीही कारवाई होऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, या कारवाईने ऐन थंडीत ज्यांनी काळापैसा जमा केलाय त्यांना घाम फोडला आहे.

# मूल होत नसल्याने भाचीला पळवलं, मावशीसह नवऱ्यालाही अटक




उल्हासनगर : मूल होत नसल्याने मावशीनेच आपल्या भाचीला पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ठाणे जिल्ह्यातील उल्हानसनगर शहरात हा प्रकार घडल्याचं समोर आलं आहे. सहा वर्षांच्या चिमुरडीच्या अपहरण प्रकरणी आरोपी मावशी आणि तिच्या नवऱ्याला पोलिसांना अवघ्या 48 तासांत बेड्या ठोकल्या.पोलिसांनी चिमुकलीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले, तेव्हा लेकीला सुखरुप पाहून पालकांना अश्रू अनावर झाले. उल्हासनगर कॅम्प क्रमांक तीनमध्ये संबंधित कुटुंब राहते. त्यांच्या 6 वर्षांच्या मुलीचं अपहरण करण्यात आलं होतं.

काय आहे प्रकरण?

या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे अन्वेषण शाखा करत होती. यावेळी रिक्षात बसलेल्या महिला-पुरुषाच्या जोडगोळीने मुलीला नेल्याची माहिती पोलिसांना समजली. तपासाच्या आधारे अंबरनाथ डिफेन्स कॉलनीत राहणाऱ्या गणेश मुदलियार आणि त्याची पत्नी सरला मुदलियार यांची पोलिसांनी धरपकड केली.

मूल नसल्याने भाचीचं अपहरण

मुदलियार दाम्पत्याच्या घरातून सहा वर्षांच्या चिमुरडीची सुटका करण्यात आली. मूल होत नसल्याने सरलाने बहिणीच्या मुलीला पळवल्याचं तपासात समोर आलं. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल मांगले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास केला. भाचीच्या अपहरण प्रकरणी पोलिसांनी मावशी आणि तिचा पती अशा दोघांनाही अटक केली आहे.

# जेलमधून दोनदा पळाला,मोबाईल चोरणारा भामटा पोलिसांच्या जाळ्यात कसा सापडला?



कल्याण : कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. अविनाश गायकवाड नावाचा हा चोरटा जेलमधून दोनदा पळून गेला होता. जेलमधून फरार झाल्यानंतर त्याने अनेक लुटीचे गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. त्याने चोरलेले पाच महागडे मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले आहेत.

**काय आहे प्रकरण?**

कल्याणमध्ये राहणाऱ्या मनिष गुप्ता याची आई त्यांच्या मूळ गावी आजमगडला जाण्यासाठी निघाली होती. 22 डिसेंबर रोजी 11 वाजून 45 मिनिटांनी जाणाऱ्या गोदाम एक्सप्रेसने त्या उत्तर प्रदेशला रवाना होणार होत्या. मनिष आईला घेऊन कल्याण रेल्वे स्थानकात आला. मात्र गाडी स्थानकात येण्यास वेळ होता. आईसाठी फळे खरेदी करण्यासाठी मनिष हा कल्याण रेल्वे स्थानकातून बाहेर पडला. एसटी स्टॅण्ड समोर उभ्या असलेल्या एका हातगाडीवरून त्याने फळे घेतली. याच दरम्यान त्याचा मोबाईल हिसकावून एक अज्ञात चोरटा पसार झाला.

**स्टेशनबाहेर मोबाईल चोरी**

मनिषने त्याची तक्रार महात्मा फुले पोलिस ठाण्यात दिली. कल्याणचे एसीपी उमेश माने पाटील यांच्या मागदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी महात्मा फुले चौक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक होनमाने आणि पोलिस निरीक्षक प्रदीप पाटील यांनी एक विशेष तपास पथक तयार केले. पोलिसांनी तपास सुरु केला.

**चोरट्याविषयीच्या माहितीने पोलीसही हैराण**

माहितीच्या आधारे एसटी स्टॅण्डला सापळा लावून पोलिसांनी एका तरुणाला ताब्यात घेतले.

# धक्कादायक! आधी औषधाचा ओव्हरडोस, मग अपहरणाचा बनाव, 5 महिन्याच्या बाळाला आईनंच संपवलं

ठाणे : ठाण्यातील कळवा परिसरातून एक धक्कादायक आणि हृदय हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. एका पाच वर्षांच्या चिमुकल्याच्या त्याच्या आईनंच खून केला असल्यानं एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपील असलेल्या आईला अटक केली असून अधिक तपास सुरु आहे.

नेमका काय प्रकार?

ही धक्कादायक घटना समोर आली आहे ठाण्यातील कळवा परिसरात असलेल्या महात्मा फुले नगरमध्ये. पाण्याच्या प्लास्टिक ड्रममध्ये एक पाच महिन्याचं चिमुकलं बाळ आढळून आलं होतं. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. याबाबत पोलिसांनी अधिक तपास केला. त्यानंतर समोर आलेल्या माहितीतून पोलिसांनी




चिमुकल्याच्या आईलाच अटक केली आहे.

घटनाक्रम काय?

आपल्या पाच महिन्याच्या मुलाचं घरातून कोणीतरी अपहरण केल्याची तक्रार 24 डिसेंबरला पोलिस स्थानकात देण्यात आली होती. शांताबाई शंकर चव्हाण यांनी कळवा पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी दिलेल्या तक्रारीवरुन तपासाला सुरुवात केली.

यादरम्यान पोलिसांना 25 तारखेला सकाळी आठच्या सुमारास घराच्या शेजारी असलेल्या प्लास्टिकच्या पाण्याच्या ड्रममध्ये मुलाचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी या बालकाचा मृतदेह शव विच्छेदनासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवला. तसंच पोलिसांनी आपली तपासाची यंत्र फिरवली आणि 24 तासाच्या आत बाळाच्या आईनेच त्या बाळाला पाण्याच्या ड्रममध्ये टाकल्याचं समोर आलंय.

तक्रार देणारा गुन्हेगार निघाला!

25 तारखेला सकाळी बाळाचा मृतदेह सापडल्यानंतर पोलीसही चक्रावून गेले होते. कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण करून त्याला जीवे मारलं आणि पुरावे नष्ट करण्यासाठी घराजवळ असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये टाकलं असावं, असा अंदाज बांधत पोलिसांनी तपासाला सुरुवात केली होती. परंतु कुठलेही तांत्रिक पुरावे नसल्यानं पोलिसांसमोर एक मोठं आव्हान उभं राहिलं होतं. सखोल चौकशी करत असताना चिमुकल्याच्या आईच्या संशयास्पद हालचाली आणि हावभाव बघून पोलिसांचा संशय बळावला होता. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणी तपासाची सूत्र हलवली. पोलिसांनी आईचीच कसून चौकशी केली.

# भरदिवसा 5 लाखांची लूट

नाशिकः नाशिकची क्राईमनगरीकडे अतिशय वेगाने होणारी वाटचाल भीतीदायक आहे. सध्या रम्य, निसर्गाच्या कुशीत वसलेले शहर पुढे चालून कसे असेल, याची शक्यता वर्तवण्यानेही थरकाप उडतो. कारण खून, दरोडे आणि लुटालूट सध्या तरी थांबताना दिसत नाहीय. आता पुन्हा एकदा एका चार जणांच्या टोळक्याने मेरी गाडी को कट क्यों मारा म्हणत तब्बल 5 लाखांची वाटमारी केली आहे. याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमके प्रकरण काय?

नाशिकमधील अशोका मार्ग भाग हा उच्चभ्रूंची वसाहत समजला जातो. येथे ही घटना घडली आहे. दुचाकीला कट का मारला, असे म्हणत दोघांनी लुटीचा बेत आखल्याचे समोर आले आहे. त्याचे झाले असे की, धीरज हिरण (रा. हॅप्पी होम कॉलनी, अशोका




मार्ग) हे अशोका मार्ग येथून कारने (एम.एच. 15 एचके 7608) चालले होते. तेव्हा दोन संशयितांनी पाठीमागून दुचाकीवरून येत त्यांची कार थांबवली. मेरी गाडी को कट क्यों मारा, म्हणत त्यांना अतिशय असभ्य भाषेत शिवीगाळ सुरू केली. मारहाण केली. इतकेच नाही, तर त्यांनी फोन करून आणखी दोघांना बोलावून घेतले. ते आल्यानंतर संशयितांनी कारची तोडफोड केली. कारच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली पाच लाखांची रक्कम आणि कागदपत्रे चोरू नेली. याप्रकरणी धीरज हिरण यांच्या तक्रारीवरून राहुल, अमिर आणि इतर दोघांवर अशोकामार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाशिक पालिकेतील 100 कोटींच्या टीडीआरचा मलिदा खाल्ला कोणी

## दीड वर्षाच्या टोलवाटोलवीनंतर अखेर चौकशी सुरू

नाशिकः अखेर तब्बल दीड वर्षानंतर नाशिकमध्ये गाजत असलेल्या 100 कोटींच्या TDR घोटाळ्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. येणाऱ्या 4 आठवड्यात चौकशी अहवाल नगरविकास खात्याला देण्यात येणार आहे. शिवसेनेचे महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी याप्रकरणी सर्वप्रथम नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या प्रकरणाच्या चौकशीसाठी धाव घेत मागणी केली. मात्र, या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले. शेवटी विधिमंडळात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर आता पुन्हा नव्यासमितीची स्थापना करत



चौकशी सुरू करण्यात आली आहे. मात्र, फक्त चार आठवड्यात चौकशी अहवाल तयार करण्यात येणार असल्याने हा फक्त दिखावू सोपस्कार ठरू नये, अशी भावना व्यक्त होत आहे.

नाशिक महापालिकेत 15,630 चौरस मीटर क्षेत्राचा टीडीआर महापालिकेने घेतला होता. त्यासाठी सिन्नर फाटा येथे असलेली जागा नाशिकरोडच्या बिटको चौकात असल्याचे दाखवली गेली. या जागेचा सरकारी भाव 6, 900 रुपये होता. मात्र, नगररचना विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून हाच दर 25,100 प्रतिचौरस मीटर लावण्यात आला.

# हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून गेस्टचा मृत्यू

नाशिक : अंबड लिंक परिसरात हॉटेलचे नूतनीकरण एका गेस्टच्या जीवावर बेतले आहे. रूम पहायला गेलेल्या गेस्टचा तिसऱ्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला आहे. विनोद गीते असे मृत युवकाचे नाव आहे. अंबड लिंक रोडवरील एक्सलेन्स इन या हॉटेलमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देखील कैद झाला आहे. सदर घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

**रुम उपलब्ध आहे का याबाबत विचारणा करण्यासाठी जाताना पडला**

नाशिकमधील अंबड लिंक रोडवर एक्सलेन्स इन नावाचे हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये नूतनीकरणाचे काम सुरु आहे. नूतनीकरणासाठी हॉटेलमधील काही भाग तोडण्यात आला आहे. काही ठिकाणी खोदकामही करण्यात आले आहे. याच दरम्यान आज विनोद गिते नामक एक तरुण काही कामानिमित्त नाशिक येथे आला होता. विनोद एक्सलेन्स इन हॉटेलमध्ये राहण्यासाठी रुम उपलब्ध आहे का यासाठी विचारणा करण्यासाठी हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर गेला होता. तिसऱ्या मजल्यावरचा कॉरिडोअरजवळचा काही भाग नूतनीकरणासाठी तोडण्यात आला होता. विनोद रुमच्या चौकशीसाठी रिसेप्शन टेबलकडे जात असतानाच लक्षात न आल्याने कॉरिडोअररील तोडलेल्या भागातून तोल जाऊन खाली पडला.तिसऱ्या मजल्यावरुन पडून खाली दगडावर आपटल्याने मृत्यू खाली सुद्धा नूतनीकरणासाठी



खोदकाम सुरु होते. विनोद तिसऱ्या मजल्यावरुन खाली पडला आणि खाली खोदकाम सुरु असलेल्या ठिकाणी असलेल्या मोठ्या दगडांवर आपटला. दगडावर आपटल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या सर्व घटनेचे दोन सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून त्यांची तपासणी करण्यात येत आहे. एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये हा युवक तोडण्यात आलेल्या बांधकामात पडत असल्याचे दिसते. तर दुसऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणात खाली पडत असल्याचे दिसत आहे.

# लेकरांना घेऊन महिला आत्महत्येसाठी शिवारात गेली पण पोलीसही तातडीनं पोहोचले




औरंगाबाद : सासरच्या छाळाला कंटाळून आत्महत्या करण्यासाठी निघालेल्या विवाहितेला तिच्या मुलासह वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे. बिडकीन शिवारातील एका विहिरीमध्ये उडी मारण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी या विवाहितेला ताब्यात घेतले. पोलिसांच्या सर्तकतेमुळे दोघांचा जीव वाचला आहे. मोबाईल लोकेशनच्या मदतीने माग काढत पोलीस या विवाहितेजवळ पोहोचले व तिला तिच्या मुलासह ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**मोबाईल लोकेशनने काढला माग**

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, औरंगाबाद जिल्ह्यात राहणारी एक विवाहिता सासरच्या मंडळीकडून होणाऱ्या सततच्या छळाला वैतागली होती. पती पेट्रोल पंपावर पेट्रोल भरत होता. याच संधीचा फायदा घेत विवाहितेने घटनास्थळावरून आपल्या मुलासह पळ काढला.

# रुग्णालयात वॉर्ड बॉयची नोकरी लावतो म्हणत 80 हजारांचा गंडा

औरंगाबादः शहरातील घाटी रुग्णालयात वॉर्ड बॉयची नोकरी लावून देण्याच्या आमिषाने अडीच लाख रुपयांची मागणी करत एका तरुणाला 80 हजार रुपयांचा गंडा घातल्याचे उघड झाले आहे. सदर व्यक्तीने तरुणाला बनावट नियुक्तीपत्र दिल्याचे उघड झाल्यावर हा प्रकार समोर आला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला गजाआड केले आहे. मात्र घाटीत नोकरी लावून देणारे रॅकेट सक्रिय आहे की काय, असा संशय व्यक्त केला जात आहे.

**काय आहे नेमकं प्रकरण?**

बेगमपुरा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अब्दुल नवीन अब्दुल रशीद शेख असे आरोपीचे नाव आहे. पठाण साबीर खान नासेर खान याने दिलेल्या तक्रारीनुसार, विवाहित असून रंगाची कामं करतो. त्यावर त्याचा उदरनिर्वाह चालतो. त्याचा मित्रही शेख चाँद शेख मुराद रंगकाम करत होता. काही दिवसांपूर्वी तो घाटीत नोकरीला लागला. त्याच्या मध्यस्थीनेच साबीरची अब्दुल नवीद या आरोपीसोबत ओळख झाली. आरोपीने त्याला फिल्ड ऑफिसर असल्याची बतावणी केली. तसेच 45 हजार रुपये पगार असल्याचीही थाप मारली. त्यानंतर अब्दुल नावीद याने पठाण साबीरला वॉर्ड बॉयची




नोकरी देण्याचे अमिष दाखवले. त्यासाठी अडीच लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. परंतु आर्थिक परिस्थिती नसल्याने एकदम एवढे पैसे देता येणार नाहीत म्हटले. मात्र तोपर्यंत टप्प्या-टप्प्याने 80 हजार रुपये दिले. नोकरी लागल्यावर महिन्याला 5 हजार रुपये असे पैसे चुकवतो असेही म्हटले.

**बोगस नियुक्तीपत्र झाले उघड**

25 मे रोजी आरोपी नवीदने पठाण साबीरला नियुक्तीपत्र दिले. ते इंग्रजीत होते. मात्र आताच रुजू होऊ नको, असे सांगितले. 13 ऑक्टोबर रोजी साबीरने नोकरीसाठी तगादा लावला. त्यावर त्याने पुन्हा एक नियुक्तीपत्र दिले. ते घेऊन साबीर 21 ऑक्टोबरला घाटीत रुजू होण्यासाठी गेला. तेथे त्याला ते बनावट असल्याचे कळले. त्यानंतर नवीदला फोन लावला असता, त्याचे दोन्ही फोन बंद असल्याचे आढळून आले. पठाण साबीर खान यांनी बेगमपुरा पोलीस स्टेशनमध्ये दाव घेतली. याप्रकरणी गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आळा. गुरुवारी रात्रीच पोलिसांनी आरोपी अब्दुल नवीद अब्दुल रशीद शेख याला बेड्या ठोकल्या.

**अनेकांची फसणवूक**

पोलीस तपासात आरोपी अब्दुल नवीद याने अशा प्रकारे नोकरी लावण्याचे आमिष दाखवत अनेकांना लाखो रुपयांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे. या सर्वांनाच पैसे घेऊन बनावट नियुक्तीपत्र दिल्याचेही तपासात समोर येत आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898